# बाबा मुक्तानंदांच्या शिकवणी

बाबा मुक्तानंदांनी ही शिकवण दिली आहे की, परम आत्मा हा सर्व मनुष्यमात्रांमध्ये महातेजयुक्त नीलबिंदूच्या रूपात विद्यमान असतो. दिव्य चिती नीलबिंदूच्या रूपात आपल्या अंतरी वास करते आणि नीलबिंदू हा अत्यंत छोटा जरी असला, तरी त्यामध्ये संपूर्ण ब्रह्मांड सामावलेले आहे. बाबांनीच नीलबिंदूविषयीचा त्यांचा अनुभव शब्दांमध्ये व्यक्त करून, आपल्या लेखांमधून व प्रवचनांमधून त्याच्या स्वरूपाविषयी शिकवले आणि या जगाला नीलबिंदूविषयी ज्ञान प्रदान केले. बाबांनी अशी शिकवण दिली आहे की, श्रीगुरुकृपा आणि सिद्धयोग साधनेप्रति समर्पण यांच्या माध्यमातून एक साधक नीलबिंदूचा अनुभव घेऊ शकतो आणि त्यायोगे त्याला स्वतःच्या दिव्यत्वाची अनुभूती होऊ शकते.

या ऑक्टोबर महिन्यादरम्यान, बाबा मुक्तानंद यांच्या महासमाधी सोहळ्याच्या वर्धापनदिनाप्रीत्यर्थ नीलबिंदूविषयी बाबांच्या या शिकवणींवर चिंतनमनन करण्यासाठी अवश्य वेळ द्या.

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.